**सं.फौ.के.नं. ३२६/२०२३**

**नि. क्र. १० लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – अनिल प्रकाश मस्कर, पो.कॉ. १३५६, संगमेश्वर पोलीस ठाणे

**वय** – २८ वर्षे,

**<u>वारंवार पुकारता १२.३० वाजेपर्यत सरकारी वकील गैरहजर सबब न्यायालयामार्फत साक्षीदाराचा सरतपास शपथेवर सुरू –</u>**

०१. दि.१४/११/२०२३ रोजी मी डिंगणी दूरक्षेत्र येथे नेमणुकीला होतो. आम्हाला विश्वसनीय बातमी मिळाली होती की, फुणगुस भोसलेवाडी येथे एक इसम गैरकायदा बिगरपरवाना गावठी हातभट्टीची दारू विक्री करतो. माहिती मिळाल्याने मी सोबत पो. हे. कॉ. मुदगल असे आम्ही सरकारी वाहन क्रमांक एम. एच. ०८ ए. वाय. २४६५ या गाडीने फुणगुस, भोसलेवाडी येथे गेलो. आम्ही तिथे गेल्यानंतर कोंडये गावचे पोलीस पाटील पदभार फुणगुस विजय शिंदे तसेच फुणगुसचे नवनिर्वाचीत पोलीस पाटील प्रशांत थुळ आणि दोन पंचाना बोलावून घेतले.

०२. आम्ही पंचासोबत प्रोव्हीवॉच करीत असताना एक इसम कुमजाई ते फुणगुस कडेवठार या रस्त्याच्या लगत असलेल्या झाडीझुडपात आपल्या पुढयात दोन कॅन आणि काचेचे ग्लास घेवून बसलेला दिसला. आम्हाला त्याचा संशय आल्याने त्याला जागीच पंचासमक्ष १९.३० वाजता पकडले. त्याच्याकडे असलेल्या कॅनमध्ये गावठी हातभट्टीची दारू मिळून आली. तसेच काचेच्या ग्लासला दारूचा वास येत होता. त्या व्यक्तीने त्याचे नाव चंद्रकांत तुकाराम महाजन असे सांगितले. आज रोजी ते न्यायालयात हजर आहेत.

०३. त्या व्यक्तीकडे आम्हाला लाल रंगाचा ०५ लीटर मापाचा ०४ लीटर दारूने भरलेला प्लॅस्टीकचा कॅन तसेच सफेद मळकट ०५ लीटर मापाचा ०४ लीटर

गावठी दारूने भरलेला प्लॅस्टीकचा कॅन व एक काचेचा दारू वासाचा ग्लास मिळून आला. मुद्देमाल जप्त करून त्या कॅनमधील सुमारे २०० मिली इतकी दारू प्लॅस्टीकच्या स्वच्छ बाटलीमध्ये रासायनिक प्रत्यंतरणाकरीता काढून घेतली. बाटली सिल करून त्यावर पोलीसाच्या सहयाची लेबले चिकटविण्यात आली. पंचनाम्या दरम्याने मी माझ्या मोबाईलमध्ये फोटो काढले. मला आज रोजी न्यायालयात दाखविण्यात आलेले फोटो तेच आहेत.

०४. मी दि. १४/११/२०२३ रोजी आरोपीविरूध्द सरकार मार्फत महाराष्ट्र दारू बंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे फिर्याद दिली. मला दाखविण्यात आलेली फिर्याद तिच आहे. फिर्यादीवर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **निशाण १३** देण्यात येते. मला दाखविण्यात आलेल्या ऑकरन्स रिपोर्टवर माझी सही आहे. त्याला **निशाण १४** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेतर्फे –**

०५. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी वाहनाचे लॉग बुकचे उतारे असतात. हे म्हणणे खरे आहे की, लॉगबुकमध्ये वाहनाची सर्व नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, आमचे डयुटी बटवडा रजिस्टर असते. हे म्हणणे खरे आहे की, कामानिमित्त पोलीस पाटलांचे आमच्याशी संबंध चांगले असतात. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या सांगण्यावरून ते गरजेनुसार मदत करतात. हे म्हणणे खरे नाही की, नोव्हेंबर महिन्यात संध्याकाळी ७.३० वाजता पूर्ण काळोख असतो. हे म्हणणे खरे आहे की, फुणगुस भोसलेवाडी येथे लोकवस्ती आहे.

०६. हे म्हणणे खरे आहे की, दिवसा कुमजाई ते फुणगुस कडेवठार वाहनाची ये–जा सुरू असते. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीमध्ये पंचाचीनावे नमुद करण्यास हरकत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पंचांना कसे बोलाविण्यात आले हे फिर्यादीत

नमुद नाही हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्या दरम्याने मी फोटो काढले हे खोटे नुमद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुमेंट डायरीला नोंद करून आम्ही छाप्याकामी गेलो हे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यात मुद्देमाल मिळून आला हे मी खोटे नमुद केले आहे.

०७. हे म्हणणे खरे नाही की, रासायनिक विश्लेशणाचा अहवाल येईपर्यत द्रव पदार्थ ही दारूच होती हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.07.19 12:12:49 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – १६/०७/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**